**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**
**अपील क्रमांक : ११७९/२०२१**

**अपिलार्थी, श्रीमती अरुणा चवरे,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक वर्ग-२,**
**शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),**
**जिल्हा परिषद, नागपूर.**

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २३.०१.२०२३**
**अपीलकर्ता : अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १९.०६.२०२० | २६.०६.२०२० हस्तांतरीत | २८.१२.२०२० | २७.०१.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक १९.०६.२०२०** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "जिल्हा परिषद नागपूर मध्ये किती हिंदी माध्यमाच्या शाळा आहेत, कोणत्या पंचायत समिती मध्ये आहेत, त्यामध्ये शिकवीत असलेल्या शिक्षकांच्या शिक्षण हिंदी माध्यमातून झालेले असेलच त्या शिक्षकांचे डी.एड. प्रमाणपत्र व दहावीचे प्रमाणपत्र देण्यात यावे" याबाबत माहिती मागितल्याचे दिसून येते. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक वर्ग-२ यांनी दिनांक २६.०६.२०२० अन्वये माहिती अर्जातील नमूद माहिती पुरविण्यासाठी कार्यालयातील श्री. अमर सातपुते, कनिष्ठ सहायक यांना निर्देश देण्यात आले. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १४.०८.२०२० रोजी अपीलार्थी श्रीमती चवरे यांना कळविले की, पंचायत समिती पारशिवनी अंतर्गत हिंदी माध्यमाच्या शाळा दोन आहे (१) कोयला खदान क्र.१ व (१) कोयला खदान क्र.२ तेथील शिक्षकांचे शिक्षणाबाबत माहिती वैयक्तीक असल्यामुळे संबंधिताकडून मागवून माहिती देण्यात येईल. त्यानंतर अपीलार्थी यांनी **दिनांक २८.१२.२०२० रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे “माहिती अपुर्ण दिली असल्याने” असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी दिनांक २७.०१.२०२१ रोजी सुनावणी घेवून अपीलार्थी यांनी मागणी केलेल्या संबंधीत शिक्षकांचे डी.एड. प्रमाणपत्र व दहावीचे प्रमाणपत्र संदर्भात माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्याने तसेच सदर माहितीमध्ये कोणताही व्यापक जनहित दिसून येत नसल्याने सदर माहिती नाकारण्यात येत आहे. तथापि जिल्हा परिषद, नागपूर अंतर्गत हिंदी माध्यमांच्या शाळा किती आहेत व कोणत्या पंचायत



राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

समिती अंतर्गत आहेत. या संदर्भात माहिती श्री. अमर सातपुते क. सहा. यांनी तात्काळ अपीलार्थीस नोंदणीकृत डाकेने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी, असे आदेशीत करुन प्रथम अपील निकाली काढण्यात आले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक २१.०५.२०२१ रोजी** "माहिती दिली नाही" असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक २३.०१.२०२३ रोजी आयोगात सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत, जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक वर्ग-२ श्रीमती भारती गेडाम उपस्थित आहेत व प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) अनुपस्थित आहेत.

सुनावणी दरम्यान उपलब्ध कागदपत्रे तसेच झालेला युक्तीवाद लक्षात घेता, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १४.०८.२०२० रोजी मागितलेली माहिती शिक्षकांचे शिक्षणाबाबतची माहिती वैयक्तीक स्वरुपाची असल्यामुळे कलम ११(१) नुसार संबंधिताकडून मागवून माहिती देण्यात येईल असे अपीलार्थीस सूचीत करण्यात आले. त्याविरुध्द अपीलार्थी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २७.०१.२०२१ रोजी सुनावणी घेवून मागितलेल्या माहिती संदर्भात श्री. अमर सातपुते क. सहा. यांनी तात्काळ अपीलार्थीस नोंदणीकृत डाकेने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी, असे आदेशीत करण्यात आले असल्याचे आढळून येते. त्यावर आक्षेप नोंदवून अपीलार्थी यांनी माहिती अद्याप मिळाली नसल्याने द्वितीय अपील दाखल केले.

आज सुनावणी दरम्यान अपीलार्थी गैरहजर आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपील सुनावणी झाल्यानंतर अपीलार्थीस तात्काळ माहिती प्रदान करण्यात आली. मात्र कोयला खदान क्र.२ येथील शिक्षकांचे शिक्षणाबाबत माहिती वैयक्तीक असल्यामुळे माहिती नाकारण्यात आली असल्याने प्रदान करण्यात आली नाही. मुद्दा क्र.२ ची माहिती कलम ८(१)त्र नुसार त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्याने **मा. सर्वोच्च न्यायालयाने स्पेशल लीव्ह पिटीशन क्र.२७७३४/२०१२, गिरीश रामचंद्र देशपांडे विरुध्द केंद्रीय माहिती आयोग या प्रकरणात दिलेला निर्णय तसेच त्याअनुषंगाने** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण २०१२/९८९/प्र.क्र.४७९/सहा, मंत्रालय मुंबई-४०००३२, दिनांक १७ ऑक्टोबर २०१४ रोजी जारी केलेल्या परिपत्रकाचा हवाला देत वरील माहिती उघड करण्यास नकार दिलेला आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने पारीत केलेला आदेश लक्षात घेता व या प्रकरणात माहिती अर्जावर दिलेल्या प्रतिसादाचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी घेतलेली भुमिका माहितीचा अधिकार कायद्याशी सुसंगत असून कलम ८(१)(ञ) नुसार वरील माहिती अपिलार्थी यांना देय नसल्याचे आढळून येते. ही बाब लक्षात घेता वरील व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २३.०१.२०२३**

जावक क्रमांक 208 दिनांक 12 JAN 2024

जोशी1179/2021चवरे